सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ५८ | शनिवार, दि. २२ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

२२ नोव्हेंबर

- शक्तिशाली चक्रीवादळ मुंबईला धडकले.
- मेलबर्न, ऑस्ट्रेलिया येथे १६ व्या ऑलिम्पिक खेळांना सुरुवात झाली.
- थुंबा या भारतीय क्षेपणास्त्र प्रक्षेपण स्थळाचे उद्घाटन झाले.
- संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम ची स्थापना झाली.
- भारतीय क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी श्रीलंकेविरुद्ध ३४ वे कसोटी शतक झळकावले.
- 'वीरांगना झलकारीबाई कोळी' १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात एक महत्त्वाची भूमिका, योद्धा यांचा जन्म.
- 'केशव लक्ष्मण दफ्तरी' धर्मरहस्यकार यांचा जन्म.
- पहिल्या स्त्री नाटककार, गायिका, संगीतकार हिराबाई पेडणेकर यांचा जन्म.
- 'द. शं. पोतनीस' स्वातंत्र्यसैनिक, विचारवंत, समाजसेवक आणि पत्रकार यांचा जन्म.
- 'डॉ. लक्ष्मीकांत झा' आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थतज्ज्ञ, मुत्सद्दी, कुशल प्रशासक, रिझर्व बँकेचे गव्हर्नर यांचा जन्म.
- 'त्र्यं. वि. सरदेशमुख' साहित्यिक यांचा जन्म.
- 'एकनाथ पांडुरंग रेंदाळकर' कवी व संपादक यांचे निधन.

# पालिका निवडणुकीत 'शविआ'चा पहिला विजय

## सचिन पाटील यांची प्रभाग ८ (अ) मधून बिनविरोध निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील पालिका निवडणुकीत प्रभाग क्र. ८ अ (नागरिकांचा मागास प्रवर्ग) मधून अखेरच्या दिवशी प्रतिस्पर्धी दोन्ही उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यामुळे अमळनेर तालुका शहर विकास आघाडीचे उमेदवार सचिन बळवंत पाटील हे बिनविरोध विजयी झाले आहेत. त्यांच्या विजयानंतर शविआच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. सचिन पाटील यांच्या माध्यमातून शविआच्या विजयी घोडदौडचा श्रीगणेशा झाला आहे. सचिन पाटील हे नगरसेवक पदासाठी पहिल्यांदाच इच्छुक उमेदवार होते. शविआच्या तरुण कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव त्यांना उमेदवारी केली होती. या पार्श्वभूमीवर अपक्ष म्हणून रिंगणात असलेले माजी नगरसेवक विवेक पाटील यांनी मनाचा मोठेपणा दाखवून माघार घेतली. त्यांच्यासोबतच यतीन अशोक पवार यांनीही स्वयंस्फूर्तीने माघार घेतल्याने सचिन पाटील हे बिनविरोध विजयी झाले आहेत. सचिन पाटील यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी आमदार अनिलदादा पाटील व खासदार स्मिताताई वाघ यांच्या निवासस्थानी जाऊन जल्लोष केला.



### 'शविआ'वर जनतेचा दृढ विश्वास : आमदार अनिलदादा पाटील

आमदार अनिलदादा पाटील म्हणाले, की सचिन पाटील यांनी सदैव नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले आहे. अडचणीच्या काळात ते नागरिकांसाठी नेहमी धावून जातात. त्यांची स्वभावशैली अत्यंत साधी आहे. त्यांचा दृष्टीकोन सर्वसमावेशक आहे. प्रभागात त्यांचा सातत्यपूर्ण जनसंपर्क आहे. यामुळेच त्यांना जनतेने हृदयातील नेता म्हणून स्थान दिले आहे. याचीच पावती म्हणून आज ते बिनविरोध विजयी झाले आहेत. त्यामुळे प्रभागाच्या विकासाला नवी चालना मिळणार आहे. जनतेनेही आघाडीवर दाखविलेला हा विश्वास आहे. आघाडीला भक्कम पाठिंबाच लाभत आहे. या अविस्मरणीय विजयाने शविआची कार्यपद्धती, पारदर्शक नेतृत्वावर आणि जनहिताच्या राजकारणावर जनतेने ठेवलेला विश्वास अधिक दृढ झाला आहे. हा विजय म्हणजे शविआला मिळालेली मोठी भरारी आहे.

# मारवड- डांगरी पाच कि.मी. रस्त्याची दयनीय अवस्था!

## प्रवाशांसह, ग्रामस्थांच्या तक्रारींकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- तालुक्यातील मारवड- डांगरी पाच किलोमीटर रस्ता आहे. मात्र, या रस्त्याची पूर्ण दयनीय अवस्था झाली आहे. या रस्त्यावरून प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याकडे संबंधितांचे दुर्लक्ष आहे. हा रस्ता तत्काळ दुरुस्ती करावा, अन्यथा आंदोलन छेडले जाईल, असा इशारा पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी दिला आहे. अनेक वेळा तक्रारी निवेदने देऊनही प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष आहे.

रस्त्यावरील डांबर पूर्ण निघाले आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. रस्त्यावर दगडांचे थर वर थर साचले आहेत. या रस्त्यावरून दररोज विद्यार्थी, शेत मालाची वाहने, दुचाकी, चारचाकी वाहने ये- जा करतात. खराब रस्त्यामुळे त्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. रस्त्यावर पथदिवे नसल्याने रात्रीच्या मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. पावसाळ्यात तर रस्त्यावर चिखल साचल्याने प्रवास करणेही मुश्किल होते. या रस्त्याचे भाग्य उजाडेल काय? असा संतप्त प्रश्न प्रवाशांसह ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.



> रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे नागरिकांना ये-जा करणे कठीण झाले आहे. पावसाळ्यात ही परिस्थिती अधिक बिकट होते. शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांना, वृद्धांना तसेच रुग्णांना याचा नाहक त्रास होतो. रस्त्याच्या दुरुस्तीबाबत अनेक वेळा संबंधित प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे. मात्र, अद्याप याबाबत कोणीही लक्ष दिलेले नाही.
> **-विरभूषण पाटील, प्रवासी, डांगरी, ता. अमळनेर.**

# लोकशाही बळकटीसाठी श्री मंगळग्रह मंदिरात पालिकेतर्फे मतदान जनजागृती कार्यक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था ही सामाजिक जाणिवेचे उचित भान राखत विविध उपक्रम राबविणारी संस्था म्हणून लौकिकप्राप्त आहे. या संस्थेतर्फे हुंडाबंदी, नशाबंदी, अंधश्रद्धा निर्मूलन, विवाह सोहळे, मतदार जनजागृती आदी विषयांसंदर्भात भाविक तसेच पर्यटकांना नियमित शपथ देवविली जाते. त्यातून समाजात सकारात्मक परिणाम घडत असल्याचे सिद्ध झाले आहे.

सध्या अमळनेर शहरात पालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची प्रक्रिया सुरू आहे. त्या अनुषंगाने शहरातील अधिकाधिक नागरिकांनी मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदवून मतदानाची टक्केवारी वाढावी आणि लोकशाही मजबूत व्हावी, या उद्देशातून अमळनेर पालिकेच्या आरोग्य विभागातर्फे मतदान जनजागृती कार्यक्रम राबविला जात आहे. शहरात ४ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत ठिकठिकाणी हा कार्यक्रम राबविला जाणार आहे. शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर रोजी सकाळी श्री मंगळग्रह मंदिरात हा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी पालिकेच्या आरोग्य विभागातील स्वच्छता निरीक्षक संतोष जाधव, किरण कंढारे, संतोष माणिक, मुकादम गौतम बिऱ्हाडे, गोल्डी बिऱ्हाडे, स्वप्नील बिऱ्हाडे, भीमराव गजरे, मयूर बिऱ्हाडे, भय्या बिऱ्हाडे, सिद्धार्थ बिऱ्हाडे, सविता बिऱ्हाडे, कविता बिऱ्हाडे, योगराज बाविस्कर, प्रणव सोनवणे, अविनाश करंदीकर, सिद्धार्थ कढरे, शुभम घोलप, राजू सपकाळे, युनूस शेख, योगेश पवार यांच्या उपस्थितीत मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, विश्वस्त अनिल अहिरराव, श्रीमती जयश्रीताई साबे, मंगल सेवेकरी सौ. आशाताई महाले यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुभाष राऊत, उपविभागीय अधिकारी विजय गांगुर्डे, शाखा अभियंता मयूर भदाणे, कॉन्ट्रॅक्टर गणेश तुकाराम ठाकरे, नरेंद्र भाऊराव चौधरी, मयूर संजय शिरोडे, तसेच एस. के. बुकवाला, जितेश ठाकरे, मंगळ ग्रह सेवा संस्थेचे कन्स्ट्रक्शन कन्सल्टंट संजय देविदास पाटील आदींनी मतदान जनजागृतीची शपथ घेतली.




## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!**
**जय भारत...! जय स्वदेशी...!!**

**तुपाला पृथ्वीवरील सर्वांत शुद्ध खाण्याचा पदार्थ असे का म्हटले गेले?**
पान २...

**ऑस्ट्रेलिया- इंग्लंड कसोटी मालिकेला 'ॲशेस' का म्हणतात?**
पान ३...

# लाल तर नाही..! हिरवा तर नाहीच नाही...!!

## ट्रॅफिक लाईटशिवाय धावणारे भारताचे पहिले शहर राजस्थानातील कोटा ...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शहरात वाहतूक कोंडीच्या त्रासाने चाकरमानी मेटाकुटीला येतो. लाल, हिरव्या, पिवळ्या दिव्याच्या तालावर नाचावे लागते. मात्र, हे शहर प्रामाणिकपणे त्याला अपवाद आहे. जाणून घेऊयात या शहराविषयी. भारताची कोचिंग क्लासेसची राजधानी म्हणून राजस्थानमधील कोटा शहर विख्यात आहे. मात्र, या शहराने अजून एक विलक्षण टप्पा गाठला आहे. आतापर्यंत देशातील इतर कोणत्याही शहराने ही कमाल केली नाही. या शहरात आता ट्रॅफिक सिग्नलचा अडथळा नसेल. शहरवासियांना लाल, हिरव्या, पिवळ्या दिव्याच्या तालावर नाचावे लागणार नाही. ट्रॅफिक लाईटशिवाय या शहरात फिरता येईल. स्मार्ट नियोजन आणि नाविन्यपूर्ण पायाभूत सुविधांमुळे शहरातील पादचाऱ्यांना रस्त्यावरुन चालणे सोपे झाले आहे. कोटाच्या अर्बन इम्प्रूव्हमेंट ट्रस्टने (यूआयटी) हा उपक्रम राबविला. विना अडथळा न थांबणाऱ्या वाहतुकीसाठी नियोजन केले. एकमेकांशी जोडलेल्या रिंगरोडचे जाळे बांधले. पारंपारिक गर्दीच्या चौकांना बायपास करून या वाहनांना इच्छित स्थळी जाता येते. त्यामुळे त्यांच्या वेळेत आणि इंधनात मोठी बचत होत आहे. शहराची गतिशीलता आणखी वाढविण्यासाठी, शहरातील प्रमुख चौकात दोन डझनहून अधिक उड्डाणपूल आणि अंडरपास करण्यात आले. त्यामाध्यमातून शहर जोडण्यात आले. या पध्दतीने सिग्नलवर थांबण्याची गरज नाही. वाहनधारक विना विलंब सहज शहरात फिरू शकतात. परिणामी, प्रवास जलद तर होतोच, शिवाय अपघातही कमी होतात. इंधनाची बचत होते आणि प्रवास अधिक सुरळीत आणि पर्यावरणपूरक होतो.

### कोटाचा आदर्श इतर शहरांना

कोटाचे उदाहरण आता इतर भारतीय शहरांसाठी एक आदर्श आहे. वाहतूक कोंडी आणि वाहतुकीच्या समस्येने ग्रस्त असलेल्या या शहराने हे दाखवून दिले, की काळजीपूर्वक शहरी रचना आणि पायाभूत सुविधा पुरविल्यास शहरवासीयांना वाहन कोंडीतून बाहेर आणता येते. कोटामध्ये रहिवासी आणि हजारो विद्यार्थी दररोज प्रवास करतात. शहरात आता एक वाहतूक परिसंस्था तयारी झाली आहे. त्यामुळे त्यांचा प्रवास गतिमान झाला आहे. काही शहरांमध्ये रस्त्यांवरही अतिक्रमण आहे. मुख्य रस्ते, हमरस्ते आणि बाजारपेठेतील रस्ते, फुटपाथ हे सर्व अतिक्रमणधारकांनी गिळंकृत केले आहे. त्यामुळे या शहरात अंडरपास, ओव्हरब्रिज असूनही ट्रॅफिक जॅमची समस्या कायम आहे. अशावेळी अतिक्रमण काढून, वाहनधारकांना शिस्तीचे धडे देऊन अनेक शहरातील वाहतूक कोंडी कमी करता येऊ शकते. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक मजबूत केल्यासही खासगी वाहने रस्त्यावर येण्याची शक्यता कमी होते. त्यामुळे शहरातील वाहतूक कोंडी आपोआप कमी होते, असा धडा या शहराने दिला आहे.





# माघारीसाठी कुटाणेच... कुटाणे!

अमळनेर- येथील पालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष व १८ प्रभागातील ३६ जागांसाठी निवडणूक होत आहे. शुक्रवार, दि. २१ रोजी माघारीच्या अंतीमदिनी नगराध्यक्षपदासाठी ६, तर नगरसेवक पदासाठी १२९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

दरम्यान, आपला विजय हमखास व सहज व्हावा, यासाठी अनेक उमेदवारांनी त्यांना नडणाऱ्या अन्य उमेदवारांनी माघार घ्यावी यासाठी साम-दाम- दंड- भेद ही सारी हत्यारे वापरून अनेक कुटाणे केले. त्यात काहींना यश आले, काहींना थोडाफार दिलासा मिळाला, तर काहींची घोर निराशा झाली. दरम्यान, याबाबतची इत्यंभुत आकडेवारी रात्री उशिरापर्यंत प्रशासनाकडून मिळाली नाही.

# मसाला पान



# स्वेटर–लोकरीचे कपडे धुतल्यावर होणार नाहीत सैल!

## वापरा या सोप्या टिप्स...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

थंडीत आपल्या आरोग्याची जशी आपण काळजी घेतो, तशी उबदार स्वेटर आणि लोकरीच्या कपड्यांची काळजी घेणेही गरजेचे असते. थंडीची चाहूल लागल्याने कपाटातून स्वेटर, जॅकेट बाहेर येतात. मात्र, ते धुतांना काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक असते. अन्यथा ते धुतल्यावर सैल पडू शकतात. लोकरीचे कपडे वॉशिंग मशिनमध्ये धुवायचे असतील तर ते इतर कपड्यांसोबत न धुता स्वतंत्र धुवा. लोकरीचे कपडे धुताना गरम पाण्याचा वापर करण्याऐवजी थंड पाण्याचा वापर करावा. लोकरीचे कपडे धुताना डिटर्जंटचा वापर करण्याऐवजी वॉशिंग लिक्विडचा वापर करणे योग्य ठरते. लोकरीचे कपडे जास्त वेळ पाण्यात भिजत ठेवल्यास ते खराब होऊ शकतात. त्यामुळे धुण्याच्या काहीवेळ आधीच भिजवून काढावेत. धुतल्यावर लोकरीचे कपडे जोर लावून पिळल्यास ते सैल होतात. त्यामुळे हालक्या हाताने पिळावेत. लोकरीचे कपडे पाणी शोषून घेतात. त्यामुळे दोरीवर टाकल्यास ओझ्यामुळे त्यांचा आकार बदलू शकतो. त्यामुळे सुकण्यासाठी ते हँगरला अडकवावेत.

## सक्सेस स्टोरी

# अपयशातून उभारी! तीनवेळा नापास

## चौथ्या प्रयत्नात मिळविले यूपीएससी परीक्षेत यश; आयएएस अवधिजाची स्वप्नपूर्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातील सर्वांत अवघड असणारी परीक्षा म्हणजे यूपीएससी. यासाठी योग्य नियोजन, संयम आणि अभ्यासातील शिस्तबद्धता खूप महत्त्वाची आहे. या परीक्षेतील एक यशोगाथा आपण जाणून घेणार आहोत.

अवधिजा गुप्ता या यूपीएससी सीएसईच्या अशा यशस्वी उमेदवारांपैकी एक आहेत, की ज्यांनी अनेकवेळा अपयशी ठरल्यानंतरही हार मानली नाही. आपल्या मेहनत, संयम आणि आत्मविश्वासाच्या बळावर यूपीएससीमध्ये यश मिळवून इतिहास रचला. अवधिया गुप्ता मूळच्या महाराष्ट्रातील आहेत आणि एका मध्यमवर्गीय कुटुंबातून येतात. वडिलांच्या बदलीच्या नोकरीमुळे त्यांनी दहावी राजस्थानमधून आणि बारावी कोलकाता येथून केली. त्या सुरूवातीपासूनच अभ्यासात हुशार आणि मेहनती होत्या. २०२० मध्ये पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर अवधिया यांनी यूपीएससी नागरी सेवा परीक्षेची तयारी सुरू केली.

### तीनवेळा अपयश

अवधिजा यांनी यूपीएससी परीक्षेची तयारी ज्या उत्साहाने आणि जिद्दीने सुरू केली होती त्याच प्रमाणात त्यांना यश मिळविणे आव्हानात्मक ठरले. अवधिजा यांनी सलग तीन वेळा यूपीएससी सीएसईची परीक्षा दिली. परंतु तिन्ही प्रयत्नांमध्ये त्यांना केवळ निराशा आणि अपयश आले. तरीही त्यांनी हार मानली नाही. आपल्या चौथ्या प्रयत्नाच्या तयारीला लागल्या.

### मेहनतीचे फळ

प्रत्येक अपयशातून शिकत अवधिया यांनी केवळ पुढे जाण्याचा विचार केला. त्यांच्या याच मेहनतीचे आणि संयमाचे फळ म्हणून त्यांनी चौथ्या प्रयत्नात सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. त्यांनी यूपीएससी सीएसई २०२४ मध्ये ऑल इंडिया ४३ वी रँक मिळवून भारतीय प्रशासकीय सेवेसाठी (आयएएस) निवड झाली. आईएएस अवधिजा गुप्ता यांचे यश हे दर्शविते, की अपयश हे देखील यशाचीच एक पायरी आहे.

### अनेक आव्हानांचा सामना

अवधिया गुप्ता यांनी यूपीएससी परीक्षेची तयारी करताना अनेक आव्हानांचा सामना केला. त्यांच्या या प्रवासात त्यांना तीन वेळा अपयशाचा सामना करावा लागला. परंतु त्यांनी हार न मानता आपले प्रयत्न सुरू ठेवले. त्यांच्या या चिकाटी आणि मेहनतीमुळेच त्यांना चौथ्या प्रयत्नात यश मिळाले.

अवधिजा गुप्ता यांच्या यशाची कहाणी अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी दाखवून दिले, की सातत्यपूर्ण प्रयत्न आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास कोणतेही ध्येय अशक्य नाही. त्यांच्या या प्रवासात त्यांना अनेक अडचणी आल्या, पण त्यांनी हार मानली नाही.



# नोटांवर फोटो असलेला एकमेव क्रिकेटपटू

## वेस्ट इंडीजची करामत; भारताशीही आहे खास कनेक्शन!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

फ्रँक वॉरेल हे जगातील एकमेव क्रिकेटपटू आहेत, की ज्यांचा फोटो नोटांवर छापला आहे. वेस्ट इंडीज संघाचे माजी कर्णधार असलेल्या वॉरेल यांचे बारबाडोस देशात अनन्यसाधारण योगदान आहे. त्यांचे भारताशीही एक खास कनेक्शन आहे. त्यांनी १९६२ मध्ये भारतीय कर्णधार नरी कॉन्ट्रॅक्टर यांना रक्तदान केले होते. त्यांच्या खेळाडूवृत्तीमुळे ते आजही स्मरणात आहेत.

जगभरातील नोटांवर तेथील राष्ट्रपुरुषांचे, महापुरुषांचे, पंतप्रधान वा राष्ट्रपतींचे किंवा राजाचे किंवा देवतांचे फोटो छापलेले असतात. त्या व्यक्तीच्या प्रतिचा आदर व्यक्त करण्यासाठी हे फोटो छापले जातात. ज्यांचे देशासाठी अनन्यसाधारण योगदान आहे, असे लोकच फोटोंवर विराजमान होत असतात. पण एखाद्या क्रिकेटपटूचा नोटांवर फोटो असल्याचे कधी ऐकले का तुम्ही? एका देशाने ही करामत केली आहे. या देशाने त्यांच्या देशाच्या नोटांवर त्यांच्या क्रिकेटपटूचा फोटोच छापला आहे. यावरून हा क्रिकेटपटू किती महान असेल आणि या देशातील जनता त्याच्यावर किती प्रेम करत असेल हे स्पष्ट होते.

या क्रिकेटपटूचे नाव आहे फ्रँक वॉरेल. वेस्ट इंडीज संघाचा माजी कर्णधार. खरेतर वेस्ट इंडीजची टीम एका देशाची नसून द्वीपीय देशांच्या समूहाची टीम आहे. त्यातच बारबाडोस हे एक आहे. महान ऑलराऊंडर गॅरी सोबर्स सुद्धा हे बारबाडोसचे आहेत. फ्रँक वॉरेल यांच्या क्रिकेटमधील योगदानावर सेंट्रल बँक ऑफ बारबाडोस बेहद फिदा आहे. त्यामुळेच बँकेने नोटावर फ्रँक वॉरेल यांचा फोटो छापला आहे. यावरून या देशातील जनता फ्रँक वॉरेल यांच्यावर किती निस्सीम प्रेम करते हेच स्पष्ट होते आहे.

विशेष म्हणजे हा महान क्रिकेटपटू अधिक काळ जगला नाही. वॉरेल यांचे वयाच्या ४२ व्या वर्षीच निधन झाले. त्यांनी वेस्ट इंडिजसाठी ५१ टेस्ट मॅच खेळल्या होत्या. त्यांनी या कसोटी सामन्यात ४९.४८ च्या सरासरीने ३८६० धावा केल्या आहेत. त्यांनी ६९ विकेटही घेतलेले आहेत. त्यांनी बारबाडोस आणि जमैकासाठी २०८ फर्स्ट क्लास मॅचेसही खेळल्या आहेत. वॉरेल हे अत्यंत जबरदस्त खेळाडू होते. माणूस म्हणूनही ते महान होते. विरोधी टीमसोबतच्या खेळाडूंसोबतचे त्यांचे संबंध अत्यंत चांगले होते.




### भारतीय क्रिकेटपटूशी जोडले रक्ताचे नाते..!

वॉरेल यांच्यासोबत क्रिकेट खेळलेले असंख्य क्रिकेटर आजही त्यांच्या स्वभावाचे कौतुक करतात. वॉरेल यांचा तर भारतीय टीममधील एका खेळाडूशी तर रक्ताचे नातेही आहे. म्हणजे त्यांनी भारतीय संघाचे माजी कर्णधार नरी कॉन्ट्रॅक्टर यांना रक्त दिले होते. १९६२ मधील ही गोष्ट आहे. तेव्हा वॉरेल हे भारताच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी एका मॅचमध्ये कॉन्ट्रॅक्टर यांना मार लागला होता. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालयात नेईपर्यंत त्यांचे रक्त बरेच वाहून गेले होते. त्यामुळे डॉक्टरांनी कॉन्ट्रॅक्टर यांना रक्त चढवावे लागेल तरच उपचार होतील असे सांगितले होते. तेव्हा वॉरेल यांनी कोणतेही आढेवेढे न घेता कॉन्ट्रॅक्टर यांना आपले रक्त दिले होते.

# दोन लग्न न केल्यास ‘ या ’ देशात जन्मठेप

## मुलींनीही नकार दिल्यास त्यांना दिली जाते कठोर शिक्षा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



लग्न ही आपल्या जीवनातील एक महत्त्वाची घटना आहे. आपल्या देशात एका लग्नाला परवानगी आहे. पहिली पत्नी असताना आणि घटस्फोट झाला नसताना दुसरे लग्न केले तर तो गुन्हा ठरतो. एकाच वेळी एकापेक्षा जास्त लग्न करण्यास आपल्या देशात बंदी आहे. पण जगात असा एक देश आहे ज्या देशात दोन लग्न करणे हे प्रत्येक पुरुषाला अनिवार्य आहे. त्याने तसे केले नाही तर त्याला थेट जेलची हवा खाली लागते. बरे हा नियम फक्त पुरुषांसाठीच नाही तर तो महिलांनाही बंधनकारक आहे. त्यांनी ही जर का आपल्या पतीला दुसऱ्या लग्नापासून रोखले तर त्या महिलेला ही कठोर शिक्षा सुनावली जाते. हे तुम्हाला एका चित्रपटाच्या कथानकासारखे वाटेल. पण हे सत्य आहे.

### या देशात आहे ही प्रथा

हा देश पूर्व आफ्रिकेत आहे. त्या देशाचे नाव इरिट्रीया आहे. या देशातील एक अत्यंत कठोर आणि अनोखा कायदा सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेचा विषय ठरला आहे. इरिट्रियामध्ये प्रत्येक पुरुषाला किमान दोन महिलांशी विवाह करणे बंधनकारक आहे. या नियमाचे उल्लंघन केल्यास पुरुषांना तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. विशेष म्हणजे या नियमाला विरोध करणाऱ्या महिलांनाही कठोर शिक्षा केली जाते. पुरुषांना तर जन्मठेपेच्या शिक्षेची तजवीज करण्यात आली आहे. दोन लग्न का याचेही कारण या देशाच्या सरकारने पटवून दिले आहे.

### कायदा कडक का?

इरिट्रियाच्या सरकारने हा कठोर नियम लागू करण्यामागे देशातील लिंग गुणोत्तराचे असंतुलन हे प्रमुख कारण दिले आहे. इरिट्रिया अनेक वर्षांपासून शेजारील देश इथिओपियासोबत युद्धात गुंतला होता. या दीर्घकाळ चाललेल्या युद्धामुळे देशातील अनेक पुरुष मारले गेले आहेत. त्याचा परिणाम म्हणून देशात पुरुषांपेक्षा महिलांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. या विषमतेमुळे सरकारने देशाची लोकसंख्या आणि सामाजिक संतुलन राखण्यासाठी हे ‘ दोन पत्नी ’चे धोरण स्वीकारले. त्यातून मुलांची उत्पत्ती होईल आणि लोकसंख्या वाढेल हा त्यामागचा उद्देश आहे.

### नियम मोडल्यास काय होते?

या कायद्यानुसार इरिट्रियातील प्रत्येक पुरुषाला दोन महिलांशी विवाह करावा लागतो. जर एखाद्या पुरुषाने या नियमाचे उल्लंघन केले किंवा दोन विवाह करण्यास नकार दिला, तर त्याला तुरुंगवासाची शिक्षा होते. तसेच जर पहिली पत्नी किंवा दुसरी पत्नी या विवाहाला विरोध करत असेल, तर त्या महिलेलाही गंभीर शिक्षा किंवा जन्मठेप देखील होऊ शकते. हा कायदा देशात लागू झाला असला, तरी अनेक मानवाधिकार संघटनांनी यावर टीका केली आहे. ते या कायद्याला सक्तीचे लग्न आणि मानवी हक्कांचे उल्लंघन मानत आहेत. इरिट्रिया सरकारने मात्र देशाच्या संरक्षणासाठी आणि भविष्यासाठी हा निर्णय आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे.

**...मग मित्रांनो कुणा कुणाला हवे या देशाचे नागरिकत्व ?**

# तुपाला पृथ्वीवरील सर्वांत शुद्ध खाण्याचा पदार्थ का म्हटले गेले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



तूप म्हटले की तुम्हाला काय आठवते? गरमागरम पुरणपोळ्या किंवा उकडीचे मोदक आणि त्यावर साजूक तूप. साजूक तूप केवळ महाराष्ट्रीयन लोकांसाठीच नाही तर इतर अनेक भारतीयांसाठी जीव की प्राणच आहे. पण गेल्या काही वर्षांत तुपाची लोकप्रियता कमी झाली होती. मात्र आता हळूहळू तूप पुन्हा लोकप्रिय होताना दिसत आहे.

काटला मासा आणि भात किंवा मग फयाना भात किंवा मॅश पोटॅटो डिश, की मग साधी मुगाची खिचडी...या सर्वांना अधिक लज्जत येते ती चांगल्या तुपाच्या जोडीने. तुपाशिवाय बंगाली जेवण अपूर्णच. केवळ बंगालीच काय कोणतेही पारंपरिक भारतीय जेवण हे तुपाशिवाय अपूर्णच म्हणावे लागेल. मात्र अलीकडच्या काळात तुपाविषयचीचे हे प्रेम कमी झालेले दिसले, अशी खंत काही जण व्यक्त करताना दिसतात. त्याचे कारण म्हणजे तूप आरोग्यासाठी चांगले हे नसते, असे ऐकतच आमची पिढी मोठी झाली.

ते पुढे सांगतात, की, आज पृथ्वीवर सर्वांत शुद्ध अन्न कोणते असेल तर ते तूप आहे. हजारो वर्षांपासून तूप हा भारतीय उपखंडातील आहाराचा मुख्य भाग आहे. पण गेल्या काही वर्षांत मात्र लोक तूप खाणे टाळत होते. याचे कारण म्हणजे तुपात सॅच्युरेटेड फॅट मोठ्या प्रमाणात असतात. त्यामुळे शरीरातील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढते ही भीती. पण आता पुन्हा अनेक जण आपल्या आहारात तुपाचा समावेश करून घेताना दिसत आहेत. गेल्या काही दिवसांत असे काय घडले की ज्यामुळे भारतीय लोकांमध्ये पुन्हा तूप लोकप्रिय होऊ लागले आहे, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा काही जण प्रयत्न करतात. ‘ जुने ते सोने’ असे म्हटले जाते आणि त्याचाच प्रत्यय आता आहाराबाबत होताना दिसत असल्याचे एक चित्र आहे. गेल्या काही दिवसांपासून लोकांमध्ये आहाराविषयी नवा दृष्टिकोन तयार होत आहे आणि कोरोनाच्या काळात याला एक गती मिळाली.

कोरोनाच्या काळात ‘ स्लो फूड ’ची मागणी वाढली. तूप तर अगदी तसेच आहे आणि महत्त्वाचे म्हणजे भारतीय संस्कृतीचे आणि तुपाचे नाते अतूट आहे. नितीन आहिर हे गुजरातच्या सुरतमध्ये डेअरी फार्मिंग आणि सेंद्रीय शेतीचा व्यवसाय करतात. व्यावसायिक स्तरावर तूप करण्यासाठी बहुतेक जण संकरित गायींचा वापर करताना दिसतात. पण आहिर हे गीर गायींच्या दुधापासून बनलेल्या तुपाची विक्री करतात. म्हणूनच त्यांच्या संस्थेचे नाव गीर ऑर्गेनिक असे आहे. त्यांच्याकडे तयार होणारे तूप हे ए–२ प्रकारचे असून पारंपरिक पद्धतीचा रवी वापरून हे तयार केले जाते. फक्त फरक इतकाच आहे की रवी हाताने फिरविला जातो. या ठिकाणी मोटार वापरली जाते.

कोरोनाच्या साथीनंतर तुपाची मागणी २५–३० टक्क्यांनी वाढल्याचे आहिर सांगतात. भारतातील हवामान उष्ण असते. या ठिकाणी लोणी किती दिवस राहील हे सांगता येणार नाही. त्यामुळे मंद आचेवर लोणी वितळवून तूप करण्याची पद्धत भारतात विकसित झाली. भारतात तूप हा लोकप्रिय प्रकार तर आहेच; पण त्याचबरोबर श्रद्धेशीही तुपाची सांगड घातली जाते.

### उपासनेसाठी पवित्र, वेदांमध्येही वर्णन

तुपाच्या पावित्र्याबद्दल लेखिका आणि इतिहासकार पृथा सेन सांगतात, की तूप हे दुधाचे शेवटचे आणि शुद्ध स्वरूप आहे. ते पूजेसाठी सर्वांत पवित्र मानले जाते. असे म्हटले जाते, की तुपासोबत पूजा केल्याने तुमची प्रार्थना ईश्वरापर्यंत पोहोचते, अशी मान्यता आहे.

### फीस्ट अँड फास्ट्स

भारतीय खाद्यपरंपरेच्या इतिहासकार कॉलीन टेलर सेन सांगतात, की ४००० वर्षांपूर्वीच्या ऋग्वेदातही तुपाची स्तुती करण्यात आली आहे. पौराणिक कथांनुसार वैदिक काळातील देवता प्रजापती दक्ष यांनी आपल्या दोन्ही हात चोळून पहिल्यांदा तुपाची निर्मिती केली. ते तूप अग्नीत टाकून त्यांनी आपल्या मुलांची निर्मिती केली. तुपाचा भारतीय संस्कृतीशी अतूट संबंध आहे. हिंदू परंपरेनुसार विवाह असो वा अंत्यसंस्कार वा इतर कोणत्याही समारंभप्रसंगी अग्नीत तूप अर्पण केले जाते. कारण असे करणे शुभ मानले जाते. भारतीय पारंपरिक औषधप्रणाली आयुर्वेदातही तुपाचा रामबाण औषध म्हणून उल्लेख करण्यात आला आहे. त्याच्या पौष्टिक गुणधर्मांमुळे पिढ्या–दरपिढ्या आपली आजी आपल्या आईने तुपाला आपल्या घरात स्थान दिले आहे.

### घरगुती तुपावर भर

अमेरिकन खाद्यसंस्कृतीच्या लेखिका संदीपा मुखर्जी दत्ता जेव्हा आपल्या मुलांसाठी स्निग्ध पदार्थ निवडतात तेव्हा ते तूपच असावे, असा त्यांचा आग्रह असतो. त्या म्हणतात, की तुपात असणाऱ्या गुणामुळे हाडांना ताकद मिळते आणि मेंदूला चालना मिळते सोबतच जीवनसत्त्वेही मिळतात. त्यांची आई तर त्यांच्याही एक पाऊल पुढे आहे, त्या तर घरी बनवलेल्या तुपाचा आग्रह धरतात. संदीपा सांगतात, की माझी आई घरात बनवलेले तूप एका छोट्या डब्यात साठवते. कोणी जर परदेशात येत असेल तर त्यांच्याकरवी ते माझ्या मुलींसाठी पाठवून देते. त्या तुपाची शुद्धता आणि चव अवर्णनीय असते. त्या सांगतात, की ओट्ससारखा नाश्ता येण्याआधी प्रत्येक बंगाली कुटुंबात शाळेत जाणाऱ्या मुलांना घी–आलू सिधो–भात (तुपात शिजवलेला आलू भात) खायला लावायचे. मुलांना दिवसभरात पौष्टिक आणि संतुलित आहार मिळावा या उद्देशाने घी–आलू सिधो–भाताचे महत्त्व तेव्हाच्या मातांनी मानलेले होते. मात्र मागच्या काही दशकांत सॅच्युरेटेड फॅट आरोग्यासाठी हानिकारक असल्याचा दावा करण्यात आला. तेव्हापासून तुपाच्या वापरावर लक्षणीय परिणाम झाला. तुपात ५० ते ७० टक्के सॅच्युरेटेड फॅट असते. त्यामुळे भारतीय घरांमध्ये तुपाचा वापर मोठ्या प्रमाणावर घटला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com

# ऑस्ट्रेलिया– इंग्लंड कसोटी मालिकेला ‘ॲशेस’ का म्हणतात?

## वृत्तपत्रातील ‘तो’ एक लेख ठरला कारणीभूत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील प्रतिष्ठित ॲशेस कसोटी मालिकेला (द ॲशेस २०२४– २५) शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबरपासून सुरूवात झाली आहे. पर्थमधील पर्थ स्टेडियममध्ये ही कसोटी मालिका खेळवली जाणार आहे. इंग्लंड व ऑस्ट्रेलिया संघांतील हे द्वंद्व फार पूर्वीपासून चालत आहे. या दोन्ही संघांमधील या मालिकेला ॲशेस असे नाव देण्यात आले. इंग्लंडमध्ये झालेल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने पहिल्यांदाच इंग्लंडला पराभूत केल्यानंतर ॲशेस हा शब्द वापरण्यात आला होता. पण हे नाव का, कसे पडले, जाणून घेऊया.

ॲशेस मालिका २०२५– २६ ऑस्ट्रेलियात खेळवली जाणार आहे. पण पहिल्याच सामन्यासाठी ऑस्ट्रेलियाचा वर्ल्ड चॅम्पियन कर्णधार पॅट कमिन्स उपलब्ध नाही. त्यामुळे संघाची कमान स्टीव्ह स्मिथच्या नावे आहे. तर इंग्लंड संघाचे नेतृत्त्व बेन स्टोक्स करणार आहे.

इंग्लंडमध्ये झालेल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने पहिल्यांदाच इंग्लंडला पराभूत केल्यानंतर ॲशेस हा शब्द वापरात आला. १९८२ च्या मालिकेत इंग्लंड उत्कृष्ट फॉर्ममध्ये होता. मात्र, २१ ऑगस्ट १९८२ रोजी ओव्हलमध्ये झालेल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाने पहिल्यांदाच इंग्लंडचा ७ गडी राखून पराभव केला. या पराभवामुळे इंग्लंडचा क्रिकेट चाहता वर्ग खूप दु:ख झाला होता.




ऑस्ट्रेलियाने केलेल्या इंग्लंडच्या पराभवानंतर इंग्लंडच्या प्रसिद्ध वृत्तपत्राने माहिती छापली. ज्यात, “ इंग्लिश क्रिकेट २९ ऑगस्ट १९८२ रोजी ओव्हलच्या मैदानावर मृत पावले आहे. त्यांचा चाहता वर्ग शोकाकुल आहे. त्याच्यावर अंत्यसंस्कार केले जातील आणि राख नंतर ऑस्ट्रेलियाला पाठवली जाईल.” या वृत्तपत्रातील दुखःद बातमी या मथळ्यासह छापलेल्या या बातमीनंतर मालिकेला ॲशेस असे नाव देण्यात आले. इंग्लंड क्रिकेटच्या मृत्यूबद्दलच्या मथळ्यावरून ॲशेस हे नाव पुढे आले, जे अजूनही जगात प्रचलित आहे. या घटनेनंतर, पुढील मालिका ऑस्ट्रेलियन भूमीवर होणार होती. त्याआधी इंग्लंडचा कर्णधार इव्हो ब्लिगने राख परत आणण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर इंग्लंडने ऑस्ट्रेलियामध्ये ही मालिका २–१ अशी जिंकली. मेलबर्नधील विजयानंतर, काही महिलांनी इंग्लंडचे कर्णधार इव्हो ब्लिग यांना कलशसारखी ट्रॉफी दिली होती. तिसऱ्या कसोटीत वापरल्या गेलेल्या बेल्सची राख त्या ट्रॉफीमध्ये होती.

### दोन्ही देशांमध्ये ३४६ सामने

इंग्लंडने त्यानंतर पुढील आठ मालिका जिंकल्या. ऑस्ट्रेलियाने १८९१– ९२ मध्ये पहिल्यांदाच ॲशेस मालिका जिंकली. इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी मालिकेतील द्वंद्व १९३२– ३३ च्या मालिकेसाठी देखील लक्षात ठेवले जाते. जी बॉडीलाइन मालिका म्हणून ओळखली जाते. ऑस्ट्रेलियाचा महान फलंदाज डॉन ब्रॅडमन यांना रोखण्यासाठी, इंग्लंडने फलंदाजाच्या शरीरावर गोलंदाजी करण्याची आणि बहुतेक क्षेत्ररक्षकांना लेग साईडजवळ ठेवण्याची रणनीती आखली होती. डग्लस जार्डिन यांची ही रणनीती प्रभावी ठरली आणि इंग्लंडने मालिका जिंकली. आजपर्यंत या दोन्ही देशांमध्ये ३४६ कसोटी सामने खेळले गेले आहेत. ऑस्ट्रेलियाने यापैकी १४४ सामने जिंकले आहेत, तर इंग्लंडने १०८ सामने जिंकले आहेत आणि ९४ सामने अनिर्णित राहिले.

# थंडी वाढली की, काय करावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



थंडी सुरू झाली आहे. या दिवसात शरीराची काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. चला जाणून घेऊया याबाबतच्या उपाय योजना.

नियमित गरम पाणी प्या. थंड पाणी टाळा, गरम पाणी पिल्याने शरीराचे तापमान संतुलीत राहते. सर्दी, खोकला दूर राहतो. सर्दी, पडसे, खोकला रोधक दर्जेदार तेल व बाम नियमित वापरावे. ऊबदार कपडे घालावे. स्वेटर, मोजे आणि कानटोपी वापरावी. शरीराचे तापमान थंड राहू नये म्हणून संपूर्ण शरीर झाकून ठेवावे. थंडीमध्ये त्वचा कोरडी होते. यासाठी मॉइश्चरायझर आणि ओठांसाठी लिपबाम वापरावे. भरपूर पाणी प्यावे. थंडीमुळे आळस येतो. मात्र, थंडीच्या दिवसात थोडा हलका व्यायाम आणि पुरेशी झोप आरोग्यासाठी गरजेची आहे. पहाटे वॉकिंग करणे, सूर्यनमस्कार घालणे, दंड–बैठका काढणे, योगासने यातून शरीर सुदृढ राहाते. तसेच पौष्टीक सूप, गरम हळदीचे दूध, गुळ, तूप आणि ड्रायफ्रुटस यांचा आहारात समावेश करा, हे शरीराला उष्णता देतात.

# डोंगराळे बालिका हत्या प्रकरणाचा निषेध!

## अमळनेरला सुवर्णकार संखी मंचतर्फे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मालेगाव तालुक्यातील डोंगराळे भागातील एका तीन वर्षीय चिमुरडीवर झालेल्या अत्याचार व हत्याकांडाचे राज्यभरात तीव्र पडसाद उमटले आहेत. या घटनेतील आरोपीस कठोर शिक्षा व्हावी, या मागणीसाठी येथील सुवर्णकार सखी मंचतर्फे प्रांताधिकारी मयुर भंगाळे यांना शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर रोजी निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले, आहे की या घटनेने समाजमन सुन्न झाले आहे. महिला, मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. अशा नराधमांवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी. जेणेकरून भविष्यात असे धाडस कोणीही करणार नाही. लहान मुले, मुली व महिलांच्या संरक्षणासाठी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी. हा खटला जलदगती न्यायालयात चालववा. याप्रसंगी सौ. नूतन भामरे, सौ. पुनम भामरे, सौ. हेमलता भामरे, सौ. दिप्ती अहिरराव, सौ. शितल सोनार आदींसह महिलांची मोठी उपस्थिती होती.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

**ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत.** खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# ना दिल्लीत, ना यूपीत, ना महाराष्ट्रात

## भारतातील सर्वात श्रीमंत जिल्हा कोणता ? मुंबईचा नंबर कितवा ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी सर्वसाधारण अर्थसंकल्पापूर्वी आर्थिक सर्वेक्षण किंवा आर्थिक आढावा प्रसिद्ध केला जातो. या वर्षीच्या अर्थसंकल्पापूर्वी आलेल्या आर्थिक सर्वेक्षण (२०२४– २५) नुसार तेलंगणाचा रंगारेड्डी जिल्हा दरडोई जीडीपीच्या बाबतीत भारतातील सर्वात श्रीमंत जिल्हा बनला आहे.

आर्थिक सर्वेक्षणानुसार भारतातील सर्वात श्रीमंत जिल्ह्याचा दरडोई जीडीपी सुमारे ११. ४६ लाख रुपये आहे. आर्थिक सर्वेक्षण २०२४– २५ मधील आकडे आणि क्रमवारी विविध माध्यमांनी मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध केली आहे. या लिस्टमधील इतर जिल्ह्यांमध्ये हरियाणातील गुडगाव किंवा गुरुग्राम, कर्नाटकातील बेंगळुरू अर्बन, उत्तर प्रदेशातील गौतम बुद्ध नगर (नोएडा), हिमाचल प्रदेशातील सोलन, गोव्यातील उत्तर आणि दक्षिण गोवा, सिक्किममधील गंगटोक, नामची, मंगन आणि ग्यालशिंग, कर्नाटकातील दक्षिण कन्नड (मंगळूर) जिल्हा, महाराष्ट्रातील मुंबई आणि गुजरातमधील अहमदाबाद जिल्हा यांचा समावेश आहे.

### रंगारेड्डी जिल्ह्याचे योगदान

तेलंगणामधील रंगारेड्डी जिल्ह्यात आयटी क्षेत्र, प्रसिद्ध टेक पार्क, बायोटेक आणि औषधी कंपन्या यासारखे मोठे उद्योग आहेत. याचा जिल्ह्याला मोठा फायदा झाला आहे. उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी यासह विशेष घटकांनी जिल्ह्याच्या यशात मोठे योगदान दिले आहे.

### गुरुग्राम (गुडगाव), हरियाणा

भारताची राजधानी दिल्लीजवळील हरियाणातील गुडगाव किंवा गुरुग्राम आलिशान मॉल्स, उत्तम जेवणाच्या जागा आणि उंच इमारतींनी गजबजलेले आहे. जिल्ह्याचा दरडोई जीडीपी ९.०५ लाख (अंदाजे १. ५ लाख) आहे. जिल्ह्यात कॉर्पोरेटसारखे वातावरण तयार केले गेले आहे. शहराजवळ सुलतानपूर राष्ट्रीय उद्यान, आठवड्याच्या शेवटी सुट्टी घालवायचा शानदार अनुभव देते.

### गौतम बुद्ध नगर (नोएडा) उत्तर प्रदेश

त्यानंतर राजधानी दिल्लीच्या आग्नेय काठावर गौतम बुद्ध नगर नोएडा– ग्रेटर नोएडा



जिल्ह्याचे नाव आहे. जो देशातील तिसरा सर्वात श्रीमंत जिल्हा आहे. जिल्ह्याचा सरासरी दरडोई जीडीपी ८. ४८ लाख रुपये आहे. गौतम बुद्ध नगर भविष्यकालीन पायाभूत सुविधा, ताजेतवाने हिरवीगार जागा आणि सांस्कृतिक कोपऱ्यांचा एक सुंदर संगम आहे. येथे लोक ‘वल्ड्र्स ऑफ वंडर’ मनोरंजन पार्क, ओखला पक्षी अभयारण्य आणि यमुना नदीच्या काठावरील दलित प्रेरणा स्थळ यासारख्या आधुनिक आकर्षणांवर शांतपणे फिरण्याचा आनंद घेऊ शकतात.

### बेंगळुरू अर्बन, कर्नाटक

कर्नाटकातील बेंगळुरू शहर जिल्ह्याला भारताची ‘सिलिकॉन व्हॅली’चा मान मिळाला आहे आणि खरोखर बेंगळुरू शहरात क्यूबन पार्कच्या वसाहती काळातील आकर्षणापासून ते कॅफे संस्कृती आणि नंदी टेकड्यांवरील सूर्योदयापर्यंत आधुनिक तंत्रज्ञान संस्कृती आणि शांततेचा परिपूर्ण संतुलन पाहायला मिळतो. जिल्ह्याचा दरडोई जीडीपी ८. ०३ लाख आहे.

### सोलन, हिमाचल प्रदेश

भारताच्या उत्तर हिमालयीन राज्य हिमाचल प्रदेशात स्थित सोलन, नैसर्गिक सौंदर्य, आल्हाददायक हवामानाने आणि आध्यात्मिक शांततेने पर्यटकांना आकर्षित करते. याला ‘भारताचे मशरूम शहर’ म्हणूनही ओळखले जाते. सरासरी दरडोई जीडीपी ८. १० लाख रुपये असल्याने हा जिल्हा देशातील चौथा श्रीमंत जिल्हा आहे.

### उत्तर आणि दक्षिण गोवा

पश्चिम किनाऱ्यावर वसलेले गोवा राज्य नेहमीच देशी आणि परदेशी पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र राहिले आहे. उत्तर आणि दक्षिण गोवा जिल्हे सुंदर समुद्रकिनारे, पार्टी वातावरण आणि इतर गोष्टींमुळे पर्यटकांना नेहमीच आकर्षित करतात. उत्तर गोवा पार्टीच्या उर्जेने भरलेला असताना दक्षिण गोवा शांतता आणि निवांतता प्रदान करतो. आर्थिक सर्वेक्षणानुसार, या जिल्ह्याचा दरडोई जीडीपी ७. ६३ लाख रुपये आहे.

### गंगटोक, नामची, मंगन आणि ग्यालशिंग जिल्हे (सिक्कीम)

हिमालयाच्या रांगेत वसलेले सिक्कीम राज्य सुंदर बर्फाच्छादित पर्वतरांगा, प्राचीन बौद्ध मठ आणि सुंदर होम स्टेसाठी ओळखले जाते. येथील शॉपिंग स्ट्रीट्स अजूनही उत्साही आहेत. त्सोमगो लेक आणि नाथुला पास सारखी प्रेक्षणीय स्थळे भेट देण्यासारखी आहेत. जिल्ह्यातील रहिवाशांचा सरासरी दरडोई जीडीपी ७. ४६ लाख रुपये आहे.

### दक्षिण कन्नड (मंगळूर), कर्नाटक

कर्नाटकातील पश्चिम घाटात वसलेले मंगलोर किनारी शहर, सोनेरी समुद्रकिनारे, प्राचीन मंदिरे आणि किनारी मसाल्यांच्या सुगंधाने पर्यटकांचे स्वागत करते. या जिल्ह्यात पोर्तुगीज, तुळु आणि कोकणी संस्कृतींचे मिश्रण असल्याने एक अनोखी पाककृती शैली निर्माण होते. या शहराचा सरासरी दरडोई जीडीपी ६. ६९ लाख आहे.

### मुंबई, महाराष्ट्र

आर्थिक राजधानी मुंबईत चित्रपट उद्योग एक सुस्थापित उद्योग आहे. म्हणूनच चित्रपटप्रेमी या शहराला बॉलिवूड असेही म्हणतात.पर्यटक छत्रपती शिवाजी टर्मिनसच्या गॉथिक शिखरांचे कौतुक करू शकतात आणि मरीन ड्राइव्हवर सुंदर सूर्यास्त पाहू शकतात. या जिल्ह्यातील लोकांचा दरडोई जीडीपी ६. ५७ लाख रुपये आहे.

### अहमदाबाद, गुजरात

गुजरात देशातील आघाडीचे औद्योगिक राज्य मानले जाते. मात्र, सरासरी दरडोई जीडीपीच्या बाबतीत अहमदाबाद शहर इतर नऊ शहरांपेक्षा पिछाडीवर आहे. आर्थिक सर्वेक्षणानुसार, शहराचा दरडोई जीडीपी ६. ४५ लाख रुपये आहे. अहमदाबाद भारतातील पहिले युनेस्को जागतिक वारसा शहर असल्याचे कदाचित लोकांना माहिती नसेल.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!

जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# पठाणकोटचे मुक्तेश्वर महादेव मंदिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुक्तेश्वर महादेव मंदिर, ज्याला मुकेसरन मंदिर म्हणूनही ओळखले जाते. हे भगवान शिव यांचे मंदिर आणि मानवनिर्मित गुहा संकुल आहे. जे पंजाबमधील पठाणकोट शहराजवळ शाहपूर कांडी धरण रस्त्यावर आहे. हे मंदिर आहे.

ज्यामध्ये श्री गणेश, भगवान ब्रह्मा, विष्णू, हनुमान आणि देवी पार्वती यांच्या प्रतिमा आहेत. हे पठाणकोटच्या आसपासच्या सर्वांत पवित्र ठिकाणांपैकी एक मानले जाते. पौराणिक कथेनुसार पांडव त्यांच्या वनवासादरम्यान एका रात्रीसाठी गुहांमध्ये राहिले होते. असे म्हटले जाते, की काही गुहा महाभारताच्या काळातील आहेत.



### मुक्तेश्वर महादेव मंदिर

हे ठिकाण शाहपूर कंडीच्या वाटेवर आहे. पठाणकोट शहरापासून २२ किलोमीटर अंतरावर रावी नदीच्या काठावर आहे. एका टेकडीवर वसलेल्या मुक्तेश्वर महादेव मंदिरात एक पांढरे संगमरवरी लिंग आणि एक तांब्याची योनी आहे. त्याभोवती भगवान ब्रह्मा, विष्णू, पार्वती, हनुमान आणि श्री गणेशमूर्ती आहेत.

### व्युत्पत्ती

याबाबत अशी एक आख्यायिका आहे, की भगवान शिव यांनी येथे एका राक्षसाचा वध केला आणि त्याला मुक्ती दिली. संस्कृतमध्ये मुक्तेश्वर या शब्दाचा अर्थ ' मुक्तीचा देव ' असा होतो. त्यामुळे हे ' मुक्तीचे मंदिर ' बनले आहे.

### वार्षिक मेळा

दरवर्षी एप्रिल महिन्यात बैसाखी उत्सवानिमित्त या ठिकाणी मुकेसरण हा मेळा नावाचा मेळा भरतो. दरवर्षी महाशिवरात्रीच्या दिवशी एक उत्सव आयोजित केला जातो. त्यानंतर चैत्र चतुर्दशी आणि नवरात्र असे दोन उत्सव होतात. सोमवती अमावास्येला मंदिर समिती विशेष मेळाचे आयोजन करते. पंजाब आणि जवळच्या हिमाचल प्रदेश आणि जम्मू व काश्मीर या राज्यांमधून अनेक यात्रेकरू येथे पूजा करण्यासाठी येतात.

## कनखल : दक्षप्रजापति मंदिर



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कनखल, हरिद्वार शहर से बिलकुल सटा हुआ है। कनखल के विशेष आकर्षण प्रजापति मंदिर, सती कुंड एवं दक्ष महादेव मंदिर हैं। कनखल आश्रमों तथा विश्व प्रसिद्ध गुरुकुल कांगड़ी विश्वविद्यालय के लिए भी जाना जाता है।

कनखल गंगा के पश्चिमी किनारे पर स्थित है। नगर के दक्षिण में दक्ष प्रजापति का भव्य मंदिर है जिसके निकट सतीघाट के नाम से वह भूमि है जहाँ पुराणों के अनुसार शिव ने सती के प्राणोत्सर्ग के पश्चात् दक्षयज्ञ का ध्वंस किया था।

यह हिंदुओं का एक पुण्य तीर्थस्थल है, जहाँ प्रति वर्ष लाखों तीर्थयात्री दर्शनार्थ आते हैं। कनखल में अनेक उद्यान हैं जिनमें केला, आलूबुखारा, लीची, आड़ू, चकई, लुकाट आदि फल भारी मात्रा में उत्पन्न होते हैं। यहाँ के अधिकांश निवासी ब्राह्मण हैं जिनका पेशा प्रायः हरिद्वार अथवा कनखल में पौरोहित्य या पंडगिरी है।

### कनखल का पौराणिक महत्त्व ।

महाराजा दक्ष की राजधानी कनखल (हरिद्वार) में थी। एक बार दक्ष ने यज्ञ किया था, जिसमें शिव को छोड़कर सभी राजाओं को बुलाया था। दक्ष की पुत्री और शिव की पत्नी सती बिना बुलाये ही वहां यज्ञ में पहुंची। वहां पर शिव का अपमान किया गया। यह अपमान सती (पार्वती) से सहन नहीं हुआ और वह हवनकुंड में कूद कर सती हो गई। शिव को जब पता लगा तो बहुत क्रोधित हुए। शिव ने वीरभद्र को बुलाया और कहा कि मेरी गण सेना का नेतृत्व करो और दक्ष का यज्ञ नष्ट कर दो । वीरभद्र शिव के गणों के साथ गए और यज्ञ को नष्ट कर दक्ष का सर काट डाला।

## प्रायश्चित्त



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू, बौद्ध व जैन धर्मशास्त्रांप्रमाणे व्यक्तीकडून पाप घडल्यास पापाच्या क्षालनार्थ तिने करावयाचे विशिष्ट धार्मिक व्रत. प्रायश्चित्ताला नैमित्तिक कर्म म्हणतात. नित्य, नैमित्तिक, काम्य व निषिद्ध असे धर्मशास्त्रोक्त कर्माचे चार प्रकार होत. पापाच्या निमित्तानेच प्रायश्चित्त आचरावयाचे असते म्हणून त्याला नैमित्तिक कर्म म्हणतात. पाप दूर करून शुद्ध होणे, मनातील रुखरुख नष्ट करणे, रागावलेल्या देवाकडून येणारे संकट टाळण्यासाठी त्या देवाला प्रसन्न करणे, स्वतःच्या चुकीबद्दल पश्चात्तापपूर्वक शासन पतकरणे, समाजाचा बहिष्कार दूर करून पुन्हा समाजात वावरण्यास संमती मिळविणे, एखाद्या व्यक्तीचे नुकसान केले असल्यास तिला भरपाई देऊन तिचे सांत्वन करणे इ. उद्देशांनी प्रायश्चित्ते घेण्याची प्रथा जगातील बहुतेक सर्व संस्कृतींमध्ये आढळते. हा प्रायश्चित्ताचा सर्व धर्मांना लागू असलेला अर्थ होय.

' प्रायः ' म्हणजे तप व ' चित्त ' म्हणजे निश्चय (तप व निश्चय यांनी युक्त कर्म) प्राय म्हणजे पाप व चित्त म्हणजे नाश (पापाचा नाश) प्राय म्हणजे नाश व चित्त म्हणजे जोडणे (नष्ट झालेली गोष्ट पुन्हा जोडणे) इत्यादी अनेक पद्धतींनी या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला जातो. ज्ञात वा अज्ञात किंवा ज्ञात व अज्ञात अशा पापांच्या क्षयार्थ प्रायश्चित्त आचरावयाचे असते. अज्ञात पाप हे पूर्वजन्मी घडलेले वा या जन्मी घडलेलेही असू शकते.

साध्या पश्चात्तापापासून तो देहान्तापर्यंतची विविध प्रायश्चित्ते असतात. देह असेपर्यंत आचरण्याचे व देहनाश करण्याचे असे देहान्त याचे दोन अर्थ देहान्त प्रायश्चित्त म्हणजे देह असेपर्यंत आचरण्याचे प्रायश्चित्त उदा., महापातकाचे वा अतिपातकाचे प्रायश्चित्त देह पडेपर्यंत आचरावयाचे असते. स्वदेहनाश हेही एक प्रायश्चित्त असल्यामुळे त्यालाही देहान्त म्हणतात. प्रायश्चित्त सांगताना पाप जाणीवपूर्वक की अजाणता घडले ते एकदा की अनेकदा घडले पापी व्यक्तीचे वय, ज्ञान, दर्जा, परिस्थिती, देश, लिंग इत्यादी काय आहे. पाप गंभीर आहे की क्षुल्लक आहे इत्यादी गोष्टींचा विचार केला जातो. धर्मज्ञांची परिषद, धर्मगुरु, पुरोहित, शामान इत्यादींकडे जाऊन प्रायश्चित्त घ्यावयाचे असते. पुरोहिताने योग्य प्रायश्चित्त सांगितले नाही, तर त्याला पाप लागते. धार्मिक प्रायश्चित्ताबरोबरच कित्येकदा राजाकडून शिक्षाही दिली जाई. प्रायश्चित्त घेतले नाही तर पापाचे दुष्परिणाम भोगावे लागतात, प्रायश्चित्त घेऊन शिवाय नुकसानभरपाई दिली पाहिजे, पाप्याने गायीचा प्राण वाचवण्यासारखे कृत्य केले, तर प्रायश्चित्त करावे लागत नाही इत्यादी मते आढळतात.

हिंदू लोकांत चोरीसारख्या पापासाठी तसेच यज्ञातील अग्नींच्या मधून डुकर वा कुत्रा पळत गेला, यांसारख्या चमत्कारिक कारणांसाठीही प्रायश्चित्त घेतले जाई. यज्ञातील उणेपणा दूर करण्यासाठी ' श्रौतसूत्रां 'त सांगितलेली ती ' ऋत्वर्थ ' आणि स्मृतींतून पापनिवारणार्थ सांगितलेली ती ' पुरुषार्थ ' प्रायश्चित्ते होत. यातील प्रामुख्याने पुरुषार्थ प्रकारची प्रायश्चित्तेच रूढ होती. आधुनिक काळात सर्वच प्रायश्चित्ते कमी झाली आहेत.

पश्चात्तापदग्ध आणि पापमुक्त होऊ इच्छिणाऱ्या पापी माणसाला प्रायश्चित्ताचा अधिकार असे. तो स्वतः धर्मज्ञ असला, तरी त्याला परिषदेपुढे पाप कबूल करून प्रायश्चित्त विचारावे लागे. परिषदेने शक्यतो एकमुखाने निर्णय द्यावा, असे मत होते. प्रायश्चित्त विधिपूर्वक केले जाई. त्याचा प्रारंभ व शेवट अग्नीच्या प्रार्थनेने केला जाई. प्रायश्चित्ताच्या काळात मध, उडीद, मसूर इ. खाणे, संभोग, स्त्री-शूद्रांशी बोलणे, पान खाणे, उटी लावणे इ. गोष्टी निषिद्ध असत. यमनियमांचे पालन करावे लागे. राख, शेण, माती, पंचगव्य, पाणी इत्यादींनी स्नान करावे लागे. मुंडन, स्नान, मंत्र, आहुती, श्राद्ध, दान, ब्राह्मणभोजन, निद्रानियंत्रण इ. बाबतींत विशिष्ट नियम असत. प्रायश्चित्त झाल्यावर ती व्यक्ती निर्दोष झाल्याची घोषणा केली जाई. परिषदेने प्रेम, लोभ, भीती वा अज्ञान यांमुळे कमी प्रायश्चित्त सांगितले किंवा प्रायश्चित्त करू इच्छिणाऱ्या आर्ताला प्रायश्चित्त सांगितले नाही, तर परिषदेच्या सभासदांना पाप लागते, असे मानत.

परिषदेच्या निर्णयात राजा ढवळाढवळ करीत नसे परंतु निर्णयाची अंमलबजावणी करून घेण्याचे काम त्याच्याकडे असे. महत्त्वाच्या प्रायश्चित्ताला राजाची परवानगी लागत असे. प्रायश्चित्त केल्यानंतरही व्यक्तीने लोकांना भोजन, मिठाई इ. दिल्यावरच त्याला जातीच्या लोकांत मिसळता येई. म्हणजे पाप करणाऱ्या व्यक्तीला राजाची शिक्षा, प्रायश्चित्त व समाजभोजनाचा खर्च या तीन गोष्टी सोसाव्या लागत.

बहुतेक वेळा प्रायश्चित्त जाहीरपणे केले जाई परंतु पाप फक्त स्वतःलाच माहीत असल्यास त्याचे प्रायश्चित्त गुप्तपणे घेता येई व ते प्रायश्चित्त अल्पही असे. पापी व्यक्ती अग्निहोत्री, विद्वान वा वृद्ध असल्यास, प्रायश्चित्त गुप्तपणे करण्यास परवानगी असे. स्वतःलाच ते ज्ञात असेल, तर परिषदेकडे न जाता, ज्ञानी माणसाला खाजगीत विचारून, प्रायश्चित्त घेता येई. स्त्री-शूद्रांनाही प्राणायाम, दान इत्यादींच्या द्वारे गुप्त प्रायश्चित्त करता येई.

पाप जाणीवपूर्वक केले, तर दुप्पट आणि ८० वर्षांवरील व १६ वर्षांखालील पुरुष तसेच रुग्ण व स्त्रिया यांना निमपट प्रायश्चित्त दिले जाई. ५ वर्षांखालील मुलांना प्रायश्चित्त नसे. ५ ते ११ वर्षांमधील मुलांबद्दल भाऊ, वडील इत्यादी प्रायश्चित्त करीत. ब्राह्मणांना काही पापांबद्दल इतरांपेक्षा जास्त, तर काही पापांबद्दल कमी प्रायश्चित्त दिले जाई. ब्रम्हचारी, वानप्रस्थ व संन्यासी यांना गृहस्थाच्या अनुक्रमे दुप्पट, तिप्पट व चौपट प्रायश्चित्त द्यावे मामाच्या मुलीबरोबर लग्न केले, तर दक्षिण भारतात प्रायश्चित्त लागत नाही प्रायश्चित्त चालू असताना मृत्यू आला, तर पापातून सुटका होते, अष्टमी वा चतुर्दशीला तसेच सुतक असताना प्रायश्चित्त करू नये इ. नियम होते.

प्रायश्चित्तांचे अनेक प्रकार होते. तीन दिवस फक्त दिवसा व नंतर तीन दिवस फक्त रात्री जेवण घेणे, नंतर तीन दिवस न मागता मिळालेले खाणे आणि शेवटचे तीन दिवस उपवास करणे हे कृच्छ्र प्रायश्चित्त होय. याखेरीज अतिकृच्छ्र, कृच्छ्रसंवत्सर इत्यादी ' कृच्छ्र ' या नावाची अनेक प्रायश्चित्ते आहेत. चंद्रकलेच्या क्रमाने होणाऱ्या वृद्धीप्रमाणे एक, दोन अशा क्रमाने अन्नाचे घास वाढविणे वा चंद्रकलेच्या ऱ्हासानुसार घास कमी करत जाणे हे ' चांद्रायण ' होय. याचे यवमध्य, पिपीलिकामध्य इ. प्रकार आहेत. चांद्रायण हे महिनाभर करावयाचे असते. एका घासापासून १५ घासांपर्यंत दिवसांच्या क्रमाने वाढवून नंतर क्रमाने प्रतिदिवशी एक एक कमी करत जाणे, हे यवमध्य १५ घासांपासून १ घासापर्यंत प्रतिदिवशी कमी करत जाऊन पुन्हा प्रतिदिवशी १५ पर्यंत वाढविणे हे पिपीलिकामध्य होय.

पहिल्या दिवशी दर्भ बुडविलेले पाणी व पंचगव्य घेणे आणि दुसऱ्या दिवशी पूर्ण उपवास करणे हे 'सांतपन' होय. महासांतपन, अतिसांतपन, यतिसांतपन असेही सांतपनाचे प्रकार आहेत. गायीचे दूध प्राशन करताना एकेका सडातील दूध दर आठवड्यास कमी करीत जाऊन शेवटी उपवास, असे ३० दिवसांचे ' सोमायन ' होय. गुरू वा भाऊ यांचा वध केल्यास गायीला यव चारून तिच्या शेणातील त्याचे कण काढून ते १२, २४ वा ३६ वर्षे खाणे हे ' बृहद्यावक ' होय. यांखेरीज अघमर्षण, अश्वमेधावभृथ स्नान, एकभुक्त, गोव्रत, पंचगव्य, पराक, पर्णकूर्च, प्रसृतयावक, ब्रह्मकूर्च, याम्य, यावक, वज्र इत्यादी प्रायश्चित्ते सांगितली आहेत. जेव्हा स्मृतींनी कोणतेच प्रायश्चित्त सांगितलेले नसते, तेव्हा चांद्रायण, वेदजप, तप, उपवास, दान इत्यादी करावे. कृच्छ्र, अतिकृच्छ्र, चांद्रायण, गायत्रीचा जप, गोसेवा इत्यादी सर्व पापांवर चालतात, अशी मते आढळतात.

भिन्नभिन्न स्मृतींनी एकाच पापाबद्दल भिन्नभिन्न प्रायश्चित्ते सांगितली आहेत, असेही दिसते. चार महापातकांना बारा वर्षेपर्यंत दररोज तीन वेळा स्नान, जमिनीवर झोपणे, कंदमुळे खाणे, पाप घोषित करून भिक्षा मागणे, एकदा जेवणे असे एक प्रायश्चित्त असे. ब्रह्महत्या, माता, पिता इत्यादींची हत्या, अगम्य आप्तसंभोग या पापांना देहान्त म्हणजे मृत्यू येईपर्यंतचे प्रायश्चित्त दिले जाई. सर्व पापांना त्यांच्या तीव्रतेनुसार कमीजास्त प्रायश्चित्ते असत. प्राणिवध, वृक्षवेली तोडणे, गाढव वगैरेंचा दंश, नास्तिक-रजस्वलादींचा स्पर्श इ. कारणांसाठीही प्रायश्चित्त घ्यावे लागे. महारोगासारखे रोग पूर्वजन्मातील पापामुळे झाले असल्यामुळे ते पाप दूर व्हावे व पुढच्या जन्मात ते रोग पुन्हा होऊ नयेत यासाठी प्रायश्चित्त घेतले जाई. शंकराने मदनाला जाळल्यावर 'महेश्वरकृच्छ्र' केले होते यावरून देवांनाही प्रायश्चित्त घ्यावे लागे, असे दिसते.

## मुद्रा...



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शरीरातील शक्ती केंद्रांना आनंद देणारी, देवांना आनंद देणारी ही मुद्रा आहे. असुरांना म्हणजेच शरीरव्याधीना पळवून लावणारी जी अवयवांची हालचाल असते तिचे नाव मुद्रा होय. आपण रोज आपल्या इष्टदेवतेची पूजा करीत असतो. पूजा करताना त्या देवासमोर वेगवेगळ्या मुद्रा प्रदर्शित कराव्या लागतात. त्यामुळे देवता लवकर प्रसन्न होतात, असे कुलार्णव तंत्रात सांगितलेले आहे.

आपण जे पूजेत मंत्र म्हणतो ते उच्चारताना आपल्याकडून नकळत चुका होतात. त्यामुळे त्या देवतेपर्यंत आपली पूजा पोहोचत नाही. त्याकरिता पूजा करताना मंत्राबरोबर मुद्रा दाखविल्यानंतर ते मंत्र व पूजा लवकर फलद्रूप होतात. मुद्रा ही देवतांची सांकेतिक भाषा आहे. आपले शरीर हे पंचमहाभूतांचे बनविलेले आहे. आकाश, वायू, अग्नी, जल, भूमी ही ती पंचमहाभूते आहेत. त्यातील प्रत्येकाचे आपल्या शरीरात विविध कार्य सतत चालू असते. आपल्या हाताची बोटे ही या तत्त्वांचे प्रतिनिधीत्व करतात. ज्यावेळी आपण वेगवेगळ्या बोटांचा एकमेकांशी संबंध जुळवितो तेव्हा त्याच्या संपर्काने ऊर्जा तयार होते. या उर्जेव्दारे आपल्या शरीरातील तत्त्व व पृथ्वीवरील तत्त्व यांचा संबध जुळून येतो. त्यामुळे आपल्या शरीराला त्या-त्या तत्त्वावर आवश्यक असणारी ऊर्जा पृथ्वीव्दारे प्राप्त होते व शरीर निरोगी राहण्यास मदत होते. आपल्या शरीरात रोग उत्पन्न होण्याचे कारण त्या उर्जेचा अभाव, हेच एक कारण असते. म्हणून वेगवेगळ्या आजारांत आपण त्या-त्या मुद्रा करून तो आजार दूर करू शकतो.

आमच्या असंख्य ग्राहकांना
दिपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा !



एस के ज्वेलर्स
(शाखा २)
आपणांसाठी घेऊन आले आहेत...
समृध्दीची दिवाळी
शुभारंभानिमित्त १५ दिवसातील दागिन्यांच्या खरेदीवर
भव्य लकी ड्रॉ
भाग्यवान विजेता कोण?

प्रथम विजेता १० ग्रॅम सोने
व्दितीय विजेता ५ ग्रॅम सोने
तृतीय विजेता ३ ग्रॅम सोने
चतुर्थ विजेता २ ग्रॅम सोने
पाचवे विजेता १ ग्रॅम सोने

१० भाग्यवान ग्राहकांना अर्धा ग्रॅम सोने.

लकी ड्रॉ दिनांक व वेळ
रविवार, दि. २/११/२०२५
सायं. ६ वाजता

लकी ड्रॉ स्थळ
एस के ज्वेलर्स, नगरपरिषद शेजारी
स्टेशन रोड, अमळनेर

SKJ
गोल्ड । डायमंड । सिल्वर
सोन्याच्या दागिन्यांचे भव्य शोरुम

अमळनेरकरांच्या सेवेत खास
'धनत्रयोदशी' च्या
शुभमुहूर्तावर आमच्या शाखा २ चा
शनिवार, दि. १८ ऑक्टोंबर २०२५
भव्य शुभारंभ सोहळा

एस के ज्वेलर्स
१९८८
शाखा नं. २

सुवर्ण समृध्दी योजना

या योजनेत ग्राहकांनी दरमहा एक रक्कम गुंतवणूक करावी लागेल. सलग ११ महिने रक्कम भरल्या नंतर १२ व्या हप्त्याची रक्कम एस के ज्वेलर्स शाखा नं. २ भरेल. योजनेचा कालावधी हा १२ महिने असणार आहे. १२ व्या महिन्याच्या शेवटच्या तारखेला २२, २०, १८ कॅरेट दागिने खरेदी करता येतील. दागिन्याच्या मजुरीवर ६०% सुट मिळेल. सुवर्ण समृध्दी योजने अंतर्गत सवलतीचे मजुरी शुल्क केवळ ग्राहकांनी जमा केलेल्या रकमेच्या मर्यादेपर्यंतच लागू होईल.

उदा.- जर ग्राहकांनी ११ महिन्यात जमा केलेली रक्कम २००० प्रमाणे २२,००० + २००० (१२ वा हप्ता) २४०००/- असेल. आणि त्यांची दागिने खरेदी ५०,००० असेल. तर सवलतीचे मजुरी शुल्क २४,००० लागू होईल. उवर्रीत २६०००/- साठी ग्राहकाला पूर्ण दागिन्यावरील मजुरी शुल्क भरावे लागतील. या शिवाय संपूर्ण दागिन्यावरील सरकारी कर अतिरिक्त भरावे लागतील.

| दागिने | वजन | सोने भाव | मजुरी दर | मजुरी एकुण किंमत | योजनेचा लाभ | निव्वळ मजुरी | नविन मजुरी दर | लाभ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सुवर्ण दागिना | १० ग्रॅम | रूपये १,०५,००० | १० % | रूपये १,५०० | १०% - ६% | ४ % | रूपये ४,२०० | रूपये ६,३०० |

धनलक्ष्मी संचय योजना
जिंका २४ कॅरेट सोने हमखास

| ड्रॉ | गुंतवणूक | लाभ | एकुण |
|---|---|---|---|
| पहिला ड्रॉ | १ ग्रॅम | १९ ग्रॅम | २० ग्रॅम |
| दुसरा ड्रॉ | २ ग्रॅम | १८ ग्रॅम | २० ग्रॅम |
| तिसरा ड्रॉ | ३ ग्रॅम | १७ ग्रॅम | २० ग्रॅम |
| चौथा ड्रॉ | ४ ग्रॅम | १६ ग्रॅम | २० ग्रॅम |
| पाचवा ड्रॉ | ५ ग्रॅम | १५ ग्रॅम | २० ग्रॅम |
| सहावा ड्रॉ | ६ ग्रॅम | १४ ग्रॅम | २० ग्रॅम |
| सातवा ड्रॉ | ७ ग्रॅम | १३ ग्रॅम | २० ग्रॅम |
| आठवा ड्रॉ | ८ ग्रॅम | १२ ग्रॅम | २० ग्रॅम |
| नववा ड्रॉ | ९ ग्रॅम | ११ ग्रॅम | २० ग्रॅम |
| दहावा ड्रॉ | १० ग्रॅम | १० ग्रॅम | २० ग्रॅम |
| अकरावा ड्रॉ | ११ ग्रॅम | ९ ग्रॅम | २० ग्रॅम |
| बारावा ड्रॉ | १२ ग्रॅम | ८ ग्रॅम | २० ग्रॅम |
| तेरावा ड्रॉ | १३ ग्रॅम | ७ ग्रॅम | २० ग्रॅम |
| चौदावा ड्रॉ | १४ ग्रॅम | ६ ग्रॅम | २० ग्रॅम |
| पंधरावा ड्रॉ | १५ ग्रॅम | ५ ग्रॅम | २० ग्रॅम |
| सोळावा ड्रॉ | १६ ग्रॅम | ४ ग्रॅम | २० ग्रॅम |
| सतरावा ड्रॉ | १७ ग्रॅम | ३ ग्रॅम | २० ग्रॅम |
| अठरावा ड्रॉ | १८ ग्रॅम | २ ग्रॅम | २० ग्रॅम |
| एकाणीसवा ड्रॉ | १९ ग्रॅम | २ ग्रॅम | २० ग्रॅम |
| विसावा ड्रॉ | २० ग्रॅम | २ ग्रॅम | २० ग्रॅम |

सदर योजनेमध्ये भाग घेणाऱ्या सर्व सभासदांना १००% अधिक सोने मिळण्याची हमी. या योजने मध्ये २५० सभासदांचा गृप असेल. सभासदांना एस के ज्वेलर्सच्या २४ कॅरेट करंट रेट प्रमाणे प्रती १ ग्रॅम गुंतवणूक करावी लागेल. तसेच प्रत्येक महिन्यांच्या १ ते १० तारखेपर्यंत पैसे शाखेवर जमा करावे लागतील. दर महिन्यांच्या शेवटच्या तारखेला एक भाग्यवान सभासद सोडत पध्दतीने निवडला जाईल. त्यास योजनेप्रमाणे २४ कॅरेट सोने दिले जाईल आणि पुढील हप्ते भरण्याची आवश्यकता नाही. उर्वरीत २३० सभासदांना २० + १ = २१ ग्रॅम २४ कॅरेट सोने २१ व्या महिन्याच्या शेवटच्या तारखेला देण्यात येईल.

नगर परिषद शॉपिंग कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, अमळनेर, जि. जळगांव